RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक ३३] शुक्रवार, नोव्हेंबर ६, २०२६/कार्तिक १५, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ६९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५.—डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.	**पृष्ठे** १-३

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ६ नोव्हेंबर २०२६.

MAHARASHTRA ORDINANCE No. XV OF 2026.

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE DR. BABASAHEB AMBEDKAR TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT, 2014.

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

२०१४ चा महा. २९.

आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

त्याअर्थी, आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम १४क ची सुधारणा.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ याच्या कलम १४क मध्ये, पोट-कलम (१२) मधील, "कार्यकारी परिषद" या मजकुराऐवजी, "कुलपती" हा मजकूर दाखल करण्यात येईल. २०१४ चा महा. २९.

निवेदन

महाराष्ट्र राज्यामध्ये तंत्रशास्त्र विद्यापीठ स्थापन करणे व त्याचे कायद्याने संस्थापन करणे आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ (२०१४ चा महा. २९) हा अधिनियमित करण्यात आला आहे.

२. कुलगुरू हा, विद्यापीठाचा प्रमुख विद्याविषयक व कार्यकारी अधिकारी आणि विद्यापीठाच्या प्राधिकरणांचा, मंडळांचा व समित्यांचा पदसिद्ध अध्यक्ष आहे. प्र-कुलगुरू हा, संपूर्ण विद्यापीठावर अधिकारिता असणारा कुलगुरूच्या लगतनंतरच्या दर्जाचा विद्याविषयक व कार्यकारी अधिकारी आहे आणि तो, कुलगुरूच्या अनुपस्थितीत, विद्यापीठाच्या प्राधिकरणांचा, मंडळांचा व समित्यांचा अध्यक्ष म्हणून काम पाहतो.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ याच्या कलम १४क मध्ये अशी तरतूद आहे की, कार्यकारी परिषद, कुलगुरूशी विचारविनिमय करून, विद्यापीठासाठी प्र-कुलगुरूची नियुक्ती करील आणि उक्त कलमामध्ये नमूद केलेल्या कारणांवरून कार्यकारी परिषद, कुलगुरूच्या शिफारशीवरून प्र-कुलगुरूस त्याच्या पदावरून दूर करू शकेल.

तथापि, प्र-कुलगुरू हा, कुलगुरूच्या नंतरचा विद्यापीठाचा उच्च दर्जाचा विद्याविषयक व कार्यकारी अधिकारी असल्यामुळे, कुलगुरूच्या शिफारशीवरून, कार्यकारी परिषदेऐवजी कुलपतीद्वारे प्र-कुलगुरूस पदावरून दूर करू शकेल, अशी तरतूद करणे, शासनास इष्ट वाटते. म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १४क मध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ५ नोव्हेंबर २०२६.

जिष्णु देव वर्मा,
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

बी. वेणुगोपाल रेड्डी,
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.